अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार,दि.४ फेब्रुवारी २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : १२९ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## मुंबईवर हल्ल्याची धमकी, NI ला ई-मेल

✔ **मुंबई** : राष्ट्रीय तपास यंत्रणेला एक अज्ञात ईमेल आला असून त्यात मुंबईवर बॉम्ब हल्ल्याची धमकी देण्यात आली आहे. तालिबानी असल्याचा दावा करत एकाने मुंबईवर हल्ल्याची धमकी दिली आहे. या ईमेलनंतर सर्व यंत्रणा अलर्टवर आल्या असून NI नं याबाबत मुंबई पोलिसांना सूचना दिली आहे. महाराष्ट्रात विविध शहरात सुरक्षा वाढवण्यात आली असून ईमेलमध्ये संबंधिताने स्वत:ला तालिबानी म्हटलं आहे. धमकीचा ईमेल मिळाल्यानंतर सत्य शोधण्यासाठी मुंबई पोलिसांसह एनआयएने संयुक्त तपास सुरू केला आहे. या वर्षी जानेवारीच्या सुरुवातीला मुंबईतील धीरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूलमध्ये धमकीचा फोन आला होता ज्यामध्ये एका अज्ञात कॉलरने शाळा उडवून देण्याची धमकी दिली होती.

## दहावीच्या विद्यार्थ्यांना हॉल तिकीट उपलब्ध

✔ **मुंबई** : मुंबई - दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. परीक्षेला अवघा एक महिना उरलेला असताना हॉल तिकिट मिळाले नव्हते. मात्र, आता हॉल तिकिटाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. ६ फेब्रुवारीपासून दहावीच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन हॉल तिकिट उपलब्ध होणार आहे. राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने हॉल तिकिटाची तारीख जाहीर केली आहे. त्यानुसार, २ मार्चपासून सुरू होणाऱ्या इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी ६ फेब्रुवारीपासून हॉलतिकिट मिळणार आहे. राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन विद्यार्थी हॉल तिकिट डाऊनलोड करू शकतील. २ मार्च ते २५ मार्च या कालावधीत परीक्षा होणार आहे.

# २ टर्म आमदाराचा २ नंबरने केला घात; फडणवीसांच्या प्रतिष्ठेवर नवख्याची मात

✔ सुराज्य/सोलापूर



महाराष्ट्र भाजपमधील चाणक्य म्हणजे देवेंद्र फडणवीस. त्यांचा उजवा हात अशी ओळख असणारे माजी मंत्री आणि माजी आमदार म्हणजे रणजित पाटील. रणजित पाटलांच्या विजयासाठी फडणवीसांनी त्यांची प्रतिष्ठा पणाला लावलेली. अमरावती पदवीधर मतदारसंघात पाटील हे दोन टर्म म्हणजे सलग बारा वर्षे आमदार राहिलेले. निवडणूकपूर्व परिस्थिती पाहता हा मतदारसंघ भाजपचा हक्काचा मतदारसंघ असे वाटायचे. पण मतदानात झाले उलटे आणि मतमोजणीत ते बाहेर आले. सुमारे पाच हजारांपेक्षा जास्त मतदारांनी पहिल्या पसंतीचे मत न देता दुसऱ्या पसंतीचीच मते दिल्यामुळे भाजपचा घात झाला. त्यात फडणवीसांच्या प्रतिष्ठेवर मात करत ऐनवेळी उमेदवारी मिळवलेले धीरज लिंगाडे विजयी झाले.

महाविकास आघाडीचे उमेदवार असणारे धीरज लिंगाडे हे मूळ शिवसेनेचे. पण अमरावती पदवीधर मतदारसंघाची जागा महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसच्या वाट्याला गेल्यामुळे त्यांनी ऐनवेळी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. अगदी शेवटच्या दिवशी काँग्रेसचा एबी फॉर्म घेऊन उमेदवारी दाखल केले. रणजित पाटील यांच्या तुलनेत खूपच नवखे असलेले लिंगाडे यांना रणजित पाटलांना मिळालेल्या दोन नंबरच्या मतांनी तारले आणि त्यांचा विजय निश्चित झाला.

### भाजपवाल्यांचाच पाटलांना नकार

ज्या सुमारे ५ हजारांपेक्षा अधिक पदवीधरांनी फक्त दुसऱ्या क्रमांकाची मते रणजित पाटलांना दिली; त्यांनी पहिल्या पसंतीचे मत कोणालाच दिले नाही. याचाच अर्थ दोन नंबरची मते देणारे मतदार हे भाजपचेच होते. पहिल्या पसंतीचे मत दिलेले नसल्यामुळे त्यांच्या दुसऱ्या पसंतीचे मतही बाद होते; हा नियम माहिती असूनही मतदारांनी रणजित पाटलांना फक्त दुसऱ्या पसंतीची मते दिली. याचाच अर्थ भाजपवाल्यांनाच पाटील नको होते; असा अर्थ आता राजकीय जाणकारांमधून काढला जात आहे.



### मतपेटीतून दिसली नाराजी

भाजपचे रणजित पाटील यांना ४१हजार ००५ आणि काँग्रेसचे धीरज लिंगाडे यांना ४३ हजार ३८३ मते मिळाली. मतमोजणीत ८ हजार ५५१ मते बाद झाली. या बाद मतांपैकी सुमारे ५ हजारांपेक्षा जास्त मतपत्रिकांवर रणजित पाटलांच्या नावापुढे एक नंबरच्या पसंतीची मतेच नव्हती. म्हणजेच ज्यांनी पाटलांना मतदान केले आहे त्यांनी त्यांना पहिल्या क्रमांकाची पसंतीच दर्शवली नाही. थेट दुसऱ्या नंबरची पसंती दाखल '२' हा आकडा लिहिल्यामुळे ही मते बाद झाली. याचाच अर्थ मतदारांनी रणजित पाटलांविषयीची नाराजी मतपेटीत दाखवून दिली.

### अँटिइनकंबन्सी आली अंगलट

रणजित पाटील हे या मतदारसंघाचे सलग दोनवेळा (बारा वर्षे) प्रतिनिधित्व करत होते. या काळात मुख्यमंत्री असतानाही फडणवीस यांनी गृहखाते स्वत:कडे ठेवून पाटलांना गृहखात्याचे राज्यमंत्री केले होते. पाटील हे अत्यंत विश्वासू असल्यामुळे गृहखात्याचा संपूर्ण कारभार पाटील यांच्यावरच सोपवला होता. आताही पाटलांच्या विजयासाठी फडणवीसांनी ताकद लावली होती. पण पाटलांविषयी मतदारांमध्ये असलेली अँटीइनकंबन्सी अंगलट आली आणि पराभव झाल्याचे निरीक्षण राजकीय तज्ञाकडून नोंदवले गेले आहे.

## मोबाईल चोरीस गेल्याने एसटी बस पोलीस ठाण्याच्या दारात; अज्ञात चोरटा फरार

✔ सुराज्य/सोलापूर

पोलीस ठाण्याच्या समोरून रस्त्यावर अनेक एसटी बसेस धावत असतात.हे काही नवीन नाही. परंतु आपल्या खिशातील मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने बस स्थानकातून बाहेर पडलेली एसटी त्यांनी चक्क शहरातील पोलीस ठाण्यासमोर आणून लावली.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास सोलापूर वरून उस्मानाबाद कडे तुळजापूर आगाराची एसटी क्रमांक एम.एच.४०. एन.९७६२ ही निघाली होती.संपूर्ण एसटी प्रवाशांनी खचाखच भरली होती.गाडीने स्थानक सोडले अन् तेवढ्यात एस.टी मधील एका प्रवासाने माझा मोबाईल चोरीस गेला, माझा मोबाईल चोरीस गेला असे म्हणून जोरात ओरडण्यास सुरुवात केली.एसटी चालकाने तात्काळ गाडी थांबवली.आणि तिथेच प्रवाशांची झडती घेतली असता कोणत्याच प्रवाशाकडे मोबाईल आढळला नाही. दरम्यान या झटापटीत तीन-चार प्रवासी गोंधळून उतरून निघून गेले.मोबाईल सापडत नाही असे आढळून आल्याने त्यांनी बस चालकास गाडी पोलीस ठाण्याकडे नेण्यास सांगितले.गाडी तसेच पुढे सम्राट चौकात गेल्यानंतर तेथील चौकी बंद असल्याने काहींनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात जाण्यास सांगितले.चालकाने ही बस तिथून वळवून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात आणून लावली.या ठिकाणी पुन्हा प्रवाशांची झडती घेण्यात आली परंतु,चोरीस गेलेला महागडा मोबाईल आढळला नाही.त्यामुळे फिर्याद देण्याची वेळ आली असता,ज्याचा मोबाईल हरवला होता त्याच्याकडे मोबाईलची पावती नव्हती.यामुळे तक्रार देण्यास अडचण निर्माण झाली.त्यातच इतर प्रवाशांनी उशीर होत असल्याचा तगादा लावल्याने फिर्यादी तक्रार करण्यास नंतर येतो असे सांगून गाडीत बसला आणि गाडी उस्मानाबाद कडे मार्गस्थ झाली.

## सोने चोरीच्या कारणावरून जावेनेच जावेचा केला गळा आवळून खून


▶ पेटवून देऊन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न
▶ माढा तालुक्यातील अंजनगाव (खे) येथील घटना

✔ सुराज्य/सोलापूर

दागिन्याच्या चोरीचा संशय घेतल्याच्या कारणावरून जावेनेच जावेचा गळा आवळून खून केल्यानंतर पेटवून देऊन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याची घटना अंजनगाव (खे) (ता.माढा) येथे घडली असून या घटनेने अंजनगाव परिसरात खळबळ उडाली आहे.

ही घटना गुरुवार दि. २ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता घडली असून माढा पोलिसात गुरूवारी रात्री उशिरा फिर्यादी मयताचे वडील सिध्देश्वर चांगदेव जाधव (रा.मालवंडी ता बार्शी) यांच्या तक्रारीनुसार गीता शंकर पाडुळे (रा.अंजनगाव खे) हिच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उज्ज्वला किरण पाडुळे (वय २० रा. अंजनगाव खे) असे मयताचे नाव आहे. दाखल फिर्यादीनुसार २३ जानेवारी रोजी मयत उज्वला ही आपले दागिने कपाटात ठेवून माहेरी मालवंडी येथे आली होती.

नंतर सासरी अंजनगाव येथे गेल्यानंतर कपाटात दागिने सापडले नसल्याने तिची जाऊ गीताला तिने विचारणा केली.



मयत उज्वला हिने गीता पाडुळेवर संशय घेतल्याने त्यांच्यात वाद झाला. यामुळे मयत उज्ज्वलाला आरोपी गीता पाडुळे हिने चिडून कापडी गमजाने गळा आवळून जीवे मारले. यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिला पेटवून दिले.

दरम्यान दोन महिन्यापूर्वीच मयत उज्वला हिचा विवाह झाला आहे. या घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक श्याम बुआ हे करीत आहेत.

## सर्वोच्च न्यायालयाला मिळणार पाच नवे न्यायाधीश

✔ **नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालयात बढती मिळालेल्या पाच न्यायाधीशांना रविवारपर्यंत नियुक्तिपत्र दिले जाईल, अशी माहिती केंद्र सरकारच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात देण्यात आली.

डिसेंबर २०२२ मध्ये कॉलेजियमने उच्च न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयात बढती मिळालेल्या पाच न्यायाधीशांची निवड केली. या पाच न्यायाधीशांची नावे मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवण्यात आली. केंद्र सरकारने या नावांवर काय निर्णय घेतला? अशी विचारणा न्यायालयाने शुक्रवारी केली. त्यावर महाधिवक्ता आर. व्यंकटरमाणी यांनी सर्वोच्च न्यायालयात बढती मिळालेल्या न्यायाधीशांचे नियुक्तिपत्र रविवारपर्यंत जारी केले जाईल, असे स्पष्ट केले. न्या. एस. के. कौल व न्या. अभय ओक यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. बंगळूरूच्या वकील संघटनेने केंद्र सरकारच्या विरोधात याचिका केली आहे. न्यायाधीश निवडीसाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या नियमांचे पालन केले जात नाही. त्यामुळे केंद्र सरकारवर न्यायालयाच्या अवमानतेची कारवाई करावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. या याचिकेवरील सुनावणीत महाधिवक्ता आर. व्यंकटरमाणी यांनी ही हमी न्यायालयाला दिली. या हमीनुसार पाच न्यायाधीशांच्या नियुक्तीचे पत्र स्वाक्षरीसाठी राष्ट्रपती यांच्याकडे तात्काळ पाठवले जाईल व रविवारी ते न्यायाधीशांना दिले जाईल, असे आम्ही ग्राह्य धरू का?, असा सवाल न्यायालयाने केला. मात्र नियुक्तिपत्र कधी दिले जाईल याची तारीख नमूद करू नका, अशी विनंती करत आर. व्यंकटरमाणी म्हणाले, आम्ही रविवारपर्यंत नियुक्तिपत्र देण्याचा प्रयत्न करू. राजस्थान उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश पंकज मिथल, पटना उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश संजय करोल, मणिपूर उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश पी.व्ही. संजय कुमार, पटना उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असुद्दीन अमनउल्लहा व अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश मनोज मिश्रा यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून बढती देण्याचा निर्णय कॉलेजियमने घेतला. त्याची यादी १३ डिसेंबर २०२२ रोजी केंद्र सरकारकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवण्यात आली होती.



## पुणे-चिंचवडची पोटनिवडणूक महाविकास आघाडी लढवणारच

✔ **पुणे** : भाजपच्या आ. मुक्ता टिळक आणि लक्ष्मण जगताप यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या अनुक्रमे पुण्यातील कसबा आणि चिंचवड विधानसभेच्या जागी होणारी पोटनिवडणूक महाविकास आघाडीकडून लढवण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि शिवसेना(ठाकरे) नेते सुभाष देसाई यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिली.

कसबा आणि चिंचवड येथील पोटनिवडणूक महाविकास आघाडी संयुक्तरीत्या लढवणार आहे. या निवडणुकीत कोणाला कोणती जागा द्यायची याबाबत महाविकास आघाडीतील घटकपक्ष आणि त्यांच्या मित्रपक्षाशी सल्लामसलत केली जाईल. पक्षातील वरिष्ठांचा सल्ला घेतला जाईल. त्यानंतर चर्चेअंती शनिवारपर्यंत निर्णय जाहीर केला जाईल, असे जयंत पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.

अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कसबा आणि चिंचवड येथील पोटनिवडणुका बिनविरोध होण्यासाठी भाजपने प्रयत्न सुरू केले आहेत. चंद्रकांत पाटील, चंद्रशेखर बावनकुळे आदी भाजपा नेत्यांनी निवडणूक बिनविरोध करण्यासाठी मागणी केली आहे. परंतु, पंढरपूर पोटनिवडणुकीचे उदाहरण महाविकास आघाडीने भाजपला दिले आहे. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होणार नाही हे आता स्पष्ट झाले आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



गौप्यस्फोटाला उशीर झाला का ?

कल्याण
400-47-368

मेन बाजार
113-52-237

## भारत धर्मनिरपेक्ष देश येथे भडकाऊ भाषणाला परवानगी नाही

### रविवारी होणाऱ्या सकल हिंदू मोर्चाचे चित्रीकरण करा; सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

✔ सुराज्य/नवी दिल्ली

भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. येथे भडकावू भाषणाला परवानगी दिली जाणार नाही, असे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाने ५ फेब्रुवारीच्या मुंबईतील प्रस्तावित सकल हिंदू मोर्चाचे चित्रीकरण करून ते न्यायालयात सादर करा, असे आदेश पोलिसांना शुक्रवारी दिले.

मोर्चामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्यास पोलीस शहरात १५१ कलम लागू करू शकतात, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.गेल्या रविवारी सकल हिंदू समाजाचा मुंबईत मोर्चा निघाला होता. त्यावेळी मुस्लीम समाजाविरोधात भडकावू भाषणे करण्यात आली. असे प्रकार प्रतिबंध करावेत, अशी मागणी सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली होती. न्या. के. एस. जोसेफ व न्या. जे. बी. पारदीवाला



यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी अर्जदारांकडून युक्तिवाद केला. भडकावू भाषण होऊ नयेत यासाठी न्यायालयाने योग्य ते आदेश द्यावेत, अशी मागणी रवी सिब्बल यांनी केली. मात्र येत्या रविवारी होणाऱ्या हिंदू सकल मोर्चाच्या परवानगीसाठी राज्य शासनाकडे कोणताही अर्ज आलेला नाही, असे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी महाराष्ट्र सरकारच्यावतीने न्यायालयाला सांगितले.

भडकावू भाषणे होत असल्यास त्याला प्रतिबंध करायला हवे. कारण अशा प्रकारे एका समुदायाने दुसऱ्या समुदायाविरोधात भडकावू भाषण केल्यास वाद होणारच. त्यामुळे असे प्रकार रोखायलाच हवेत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मोर्चाआधीच प्रतिबंध करणे योग्य नाही. हे बोलण्याच्या अधिकारांवर गदा आणण्यासारखे आहे. तसेच हिंदू सकल मोर्चाला प्रतिबंध करण्याची मागणी करणारे अर्जदार हे केरळ येथील आहेत. ते तेथून यासाठी अर्ज कसे करू शकतात, असा युक्तिवाद सॉलिसिटर जनरल मेहता यांनी केला. मात्र कोणीही कुठूनही याचिका करू शकतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मोर्चात कोणत्याही प्रकारचे भडकावू भाषण होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यायला हवी. जर मोर्चासाठी परवानगीच मागितली नसेल तर काही प्रश्नच येत नाही. पण मोर्चासाठी परवानगी मागितलीच आणि त्यात भडकावू भाषणे होणार असतील तर प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यायला हवा, असेही न्यायालयाने नमूद केले.

## नई जिंदगी परिसरात दोन दुकानांना भीषण आग

### १२ लाखांचे नुकसान

✔ सुराज्य/सोलापूर

शहरातील नई जिंदगी परिसरात शुक्रवारी पहाटे दोन च्या सुमारास दोन दुकानांना भीषण आग लागून सुमारे १२ लाखांचे नुकसान झाले.

अरबाज वस्त्रो कलेक्शन कपड्यांचे दुकान आणि निठोरे फर्निचर दुकान या आगीत भस्म झाले आहेत. आगीचे नेमके कारण समजू शकले नाही. शुक्रवारी पहाटे दोन सुमारास आग लागल्याचे लक्षात येताच नागरिकांनी ताबडतोब



अग्निशामक दलाला माहिती दिली. अग्निशामक दलाने तीन पाण्याच्या गाड्याचा फवारा करून आग आटोक्यात आणली. या आगीत अरबाज कपड्याचे दुकानाचे सुमारे पाच लाखांचे तर निठोरे फर्निचर दुकानाचे साडेसहा लाखांचे नुकसान झाले आहे. ड्रेस मटेरियल, होजियरी कपडे, कपाट, फर्निचर, सोफासेट, पत्रे, वासे, वायरिंग असे साहित्य जळून राख झाले आहे, आगीचे नेमके कारण स्पष्ट झाले नाही.